# दगडफेक प्रकरणी ३० जणांना अटक, कोठडी

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** शहरातील कोठला भागात काल, सोमवारी झालेल्या दगडफेक, तोडफोड व रास्तारोको प्रकरणी पोलिसांनी एकुण २०० जणांपैकी ३० आरोपींना अटक केली. त्यांना न्यायालयाने तीन दिवस, ३ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने आज, मंगळवारी दिला. तोफखाना पोलीस ठाण्याचे निरीक्षक आनंद कोकरे यांनी ही माहिती दिली.



महोमंद सरफराज इब्राहीम सय्यद ऊर्फ सरफराज जहांगिरदार (वय ३७), फरदीर इरफान खान (वय १८, दोघे रा. मुकुंदनगर), जुनेद अमीर शेख (वय ३८), सलमान आरिफ शेख (वय २३, दोघे रा. बेलदार गल्ली), गुलफान निहाउद्दीन अन्सारी (वय २५), शाहरूख फारूख शेख (वय २४), मुदस्सर शब्बीर शेख (वय २५, सर्व रा. कोठला), राजीक अफरोज कुरेशी (वय २२, झेंडीगेट), हमजा शाहिद शेख (वय २०), अल्तमश अल्ताफ शेख (वय २६), शाहबाज हरून शेख (वय ३५), अकिल राजमोहंमद शेख (वय २४), जुबेर फारूख शेख (वय ३०), जहेद जाहीद शेख (वय २०), राहिल मिराजमिया सय्यद (वय २८, सर्व रा. मुकुंदनगर), अक्रम रियाज शेख (वय २८, रा. तपोवन रस्ता, सावेडी), निसार दाऊद शेख (वय ५१, रा. मंगलगेट), तबरेज ऊर्फ चाँदमिया मिर सय्यद (वय २५), अमीर अन्वर शेख (वय २९, दोघे रा. मुकुंदनगर), नदीम शौकत शेख (वय २१, रा. पिंपळगाव उजनी, ता. नगर), अदनान अल्ताफ अत्तार (वय २२ रा. मुकुंदनगर), सोहेल आयुब शेख (वय २३, रा. कोठला), इर्शाद जकीर शेख (वय २० रा. मुकुंदनगर), जाकीर ताहिद शान ऊर्फ जावेद ताहिर खान (वय २५ रा. कोठला), जिशान कदीर अत्तार (वय २२), दानीश रज्जाक शेख (वय २५ दोघे रा. मुकुंदनगर), सादिक युनुस शेख (वय ३०, रा. कराचीवालानगर), साकिन नौशाद सय्यद (वय २६, आलमगीर), मुजाहिद मुस्ताक कुरेशी (वय ३३, नालबंद खुंट), सलिम हमिद बागवान (वय ३२ रा. मुकुंदनगर) यांना पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश देण्यात आला.

नगर शहरातील माळीवाडा भागात दुर्गा दौडच्या स्वागतासाठी रस्त्यावर काढलेल्या रांगोळीतील मजकूरावरून समाजाच्या धार्मिक भावना दुखावल्यावरून सोमवारी शहरात तणावाची स्थिती निर्माण झाली होती. यातून काल सकाळी नगर- छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील कोठला चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनास हिंसक वळण लागले. जमावाने दगडफेक केली. वाहनांची तोडफोड केली. त्यात ६ पोलीस देखील जखमी झाले. यासंदर्भात तोफखाना पोलीस ठाण्यात सुमारे १५० ते २०० जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांच्या तपासात यातील सुमारे ४७ संशयितांचे नावे निष्पन्न झाली आहेत. त्यातील ३० जणांना मंगळवारी अटक करण्यात आली आहे. तसेच ६ अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले होते. त्यांना नोटीस देऊन पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

# ओवेसी यांची सभा ऐनवेळी रद्द

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** 'एमआयएम' पक्षाचे अध्यक्ष खासदार असदुद्दीन ओवेसी यांची आज, मंगळवारी सायंकाळी नगरमध्ये होणाऱ्या सभेस पोलिसांनी परवानगी दिल्यानंतरही सभा ऐनवेळी रद्द करण्यात आली. रद्द झालेल्या सभेवरून ह्यएमआयएमह्न व राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार संग्राम जगताप यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोप झडले. विशेष म्हणजे एमआयएमचे प्रदेश महासचिव समीर साजिद यांनी पोलिसांनीच संस्थेमुळे शहरातील वातावरण खराब होऊ शकते, असे सांगत सभा पुढे ढकलण्याची विनंती केल्याने, आम्ही सभा रद्द केल्याचा दावा केला आहे.

एमआयएमचे प्रमुख खासदार ओवेसी यांची शहरात पूर्वनियोजित सभा होती. दरम्यान काल, सोमवारी शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या पार्श्वभूमीवर ओवेसी यांची सभा होणार की नाही, याबद्दल आज सकाळपर्यंत संदिग्धता होती. नाशिक विभागाचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे हेही या पार्श्वभूमीवर रात्रीच नगरमध्ये दाखल झाले होते. त्यांच्यासह जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घाडगे यांनी रात्रीच सभास्थळाची पाहणी केली. अखेर आज, मंगळवारी सकाळी सभेस सशर्त परवानगी देण्यात आली.

सभा शांततेत पार पाडावी यासाठी तिथून चिथावणीखोर व इतर धर्मियांच्या भावना दुखावतील, अशा पद्धतीने वक्तव्य करू नये, धनिक्षेपकाच्या आवाजाची मर्यादा पाळावी आदी स्वरूपाच्या अटी घालण्यात आल्या होत्या तसेच एमआयएमच्या कार्यकर्त्यांसह विरुद्ध बाजूनेही एकूण सुमारे १०० हून जणांना अधिक जणांना पोलिसांनी नोटीस बजावल्या होत्या.

त्यानुसार सभेची तयारीही सुरू करण्यात आली. मुकुंदनगर भागात व्यासपीठ उभाण्यात आले. प्रेक्षकांसाठी खुर्च्याही टाकण्यात आल्या. पोलीस बंदोबस्तही तैनात करण्यात आला. सभा सायंकाळी ७ वा. होती. तत्पूर्वी खासदार ओवेसी दुपारी ३ वा. नगरमध्ये येऊन वक्फ बोर्डाच्या प्रश्न संदर्भात उलेमांची बैठक घेणार होते. पक्षाचे जिल्हाध्यक्ष डॉ. परवेज अश्रफी व माजी नगरसेवक समद खान हेही ओवेसी यांचा दौरा, सभा होणारच असे सांगत होते. मात्र, अचानक दुपारी २.३० च्या सुमारास सभा रद्द करण्यात आल्याचा निरोप मिळाला.

### सभा पुन्हा होईल

या संदर्भात बोलताना एमआयएमचे प्रदेश महासचिव समीर साजिद यांनी सांगितले की, महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक यांनी खासदार ओवेसी यांना दूरध्वनी करून सभा पुढे ढकलण्यास सांगितले. गोपनीय अहवालाच्या आधारावर सभेनंतर नगरचे वातावरण खराब होऊ शकते, असे पोलीस सांगत होते. आम्हाला सभेच्या परवानगीचे पत्र दिले तरी प्रत्यक्षात खासदार ओवेसी यांना वेगळेच सांगितले गेले. त्यानंतर ओवेसी यांनी आपण शांततेच्या, लोकशाहीच्या मार्गाने जाणारे आहोत, वातावरण खराब होणार असेल तर सभा पुन्हा नंतर घेऊ, असे कळवले. त्यामुळे सभा पुढे ढकलली. काल घडलेल्या घटनेनंतर आमच्या पुढे विनाकारण अटक केलेल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांना सोडवण्याचे प्राधान्य आहे. आज रद्द झालेली सभा पुन्हा होईल, खासदार ओवेसी पुन्हा केव्हाही नगरमध्ये येऊ शकतात. यावेळी पक्षाचे पदाधिकारी शफी उल्लाह काझी, डॉ. अश्रफी, अंजा खान, समद खान, समीर शेख, खालीद शेख आदी उपस्थित होते.

# धार्मिक भावना दुखावण्यामागील कारणांचा पोलिसांकडून शोध

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** रांगोळीच्या माध्यमातून धार्मिक भावना दुखावण्यामागे नेमका उद्देश काय होता, त्यामागे कोणाचा हात आहे का, याचा शोध घेतला जाईल, असे नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे यांनी आज मंगळवारी सांगितले. दरम्यान काल, सोमवारी सकाळी घडलेल्या रांगोळीच्या घटनेकडे ह्यगुडमॉर्निंगह्न पथकाच्या झालेल्या दुर्लक्षाचीही चौकशी केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शहरात काल घडलेली तणावाची घटना तसेच आज होणारी एमआयएमचे खासदार अससूद्दीन ओवेसी यांची सभा या पार्श्वभूमीवर पोलीस महानिरीक्षक कराळे नगरमध्ये थांबून होते. आज त्यांनी पत्रकारांशी बोलताना वरील माहिती दिली. जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यावेळी उपस्थित होते. कराळे यांनी शहरातील पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेऊन माहिती घेतली व तपासाच्या सूचना दिल्या.

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात तणावाच्या घटना वाढत आहेत का, या प्रश्नावर त्यांनी या संदर्भातही चौकशी केली जाईल असे सांगितले. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाज माध्यमातून चिथावणीखोर वक्तव्यात वाढ होत आहे, या संदर्भात पोलिसांना अधिक सतर्क राहण्याच्या सूचना त्यांनी केल्या तसेच आगामी सणउत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील बंदोबस्तात वाढ करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

शहरात गेल्या काही दिवसात घडलेल्या तणावाच्या घटनांमध्ये पोलिसांनी मुळापर्यंत तपास केला नाही, या अक्षेपावर त्यांनी, जिल्हा पोलीस दलास सूचना केली जाईल असेही स्पष्ट केले. रांगोळीच्या माध्यमातून धार्मिक भावना दुखावल्याच्या गुन्ह्यात कोतवाली पोलिसांनी संग्राम आसाराम रासकर (रा. बारातोटी कारंजा, माळीवाडा, नगर) याला काल अटक केली. त्याला उद्या, बुधवारपर्यंत पोलीस कोठडी ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिलेला आहे.

# संग्राम जगताप – 'एमआयएम'मध्ये आरोप-प्रत्यारोप

## प्रतिसाद नसल्याने रद्द : जगताप; घाबरल्याने षडयंत्र : साजिद

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** एमआयएम पक्षाचे खासदार असदुद्दिन ओवेसी यांची आज, मंगळवारी होणारी सभा ऐनवेळी रद्द करण्यात आली. मात्र त्यावरून एमआयएमचे पदाधिकारी व राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) आमदार संग्राम जगताप यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. सभेचा प्रतिसाद पाहून घाबरलेल्यांनी शहरात तणावाचे षडयंत्र रचले, असा आरोप एमआयएमचे प्रदेश महासचिव समीर साजिद यांनी केला तर सभेला गर्दीच होणार नव्हती म्हणून सभा रद्द झाली, अशी टीका आमदार जगताप यांनी केली.

एमआयएमचे समीर साजिद यांनी सभा रद्द झाल्याची माहिती देताना आमदार जगताप यांच्यावर नाव न घेता आरोप केले. ते म्हणाले शहरात होणारी सभा पाहून काल तणावाचे वातावरण निर्माण केले. घाबरलेल्यांनी षडयंत्र रचले. शहराला कोण आग लावत आहे हे सर्वांना माहीत आहे. शहराचे आमदार संविधानाची शपथ घेऊन धार्मिक तेढ निर्माण करत आहेत. मुस्लिम समाजाला शिवीगाळ करत आहेत. आम्ही समाज जोडण्याचे काम करतो. आमचा लोकशाही मार्गावर विश्वास आहे. या षडयंत्राची पोलिसांनी सखोल चौकशी करावी ओवेसी शहरात येऊ नयेत म्हणूनच ते घडवण्यात आले. आमदारांच्या वक्तव्यामुळे शहरात गुंतवणूकदार व पर्यटक येणार नाहीत.

आमदार जगताप म्हणाले, की गेल्या काही दिवसांपासून शहरात चिथावणीखोर फलक लावले गेले. पोलिसांनी कायदा हातात घेणाऱ्यांना चांगला धडा शिकवला. सभेला प्रतिसाद मिळावा म्हणूनच तणावाचे षडयंत्र निर्माण करण्यात आले. पोलिसांनी फलक कोणी लावले, त्यांना पैसे कोणी दिले, त्याची छपाई कोठे झाली, या सर्वांची चौकशी करावी. भगवा टिळा लावला म्हणून पोलिसांसमोर मारहाण करण्यात आली. पुन्हा सभा झाली तरी लोकशाही मार्गाने घ्यावी, नगरच्या जीवनावर त्याचा परिणाम होऊ नये असेही ते म्हणाले.

### आमदार जगताप-एमआयएमची मागणी एकच

माळीवाडा भागात धार्मिक भावना दुखावल्या प्रकरणी रांगोळी काढणाऱ्या संशयीतास पोलिसांनी अटक केली होती, त्यामुळे पुन्हा कोठला चौकात आंदोलन करण्याची गरज नव्हती. या जमावाला तेथे कोणी नेले, आंदोलन करण्यास, दगडफेक करण्यास, पोलिसांना धक्का देण्यास कोणी भाग पाडले ? वेगळे वळण लावण्यासाठीच हा जमाव तेथे नेला गेला. पोलिसांनी याची चौकशी करावी, अशी मागणी आमदार जगताप आणि एमआयएमचे समीर साजिद या दोघांनीही केली. दोघांनी या मुद्द्यावर एकसारखेच मत व्यक्त केले.






# सरसकट पंचनामे, ओला दुष्काळ जाहीर करा – विठ्ठलराव लंघे

लोकसत्ता प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी आमदार विठ्ठलराव लंघे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मुंबईत निवेदन देऊन केली आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी त्यास सकारात्मक प्रतिसाद देत राज्य सरकार आवश्यक ती मदत देईल, असे आश्वासन दिल्याचे आमदार लंघे यांनी सांगितले.

नेवासा तालुक्यात जोरदार पावसाने शेतकरी, नागरिक आणि व्यापाऱ्यांचे प्रचंड नुकसान केले. सरसकट नुकसान भरपाई देताना ओला दुष्काळही जाहीर करण्याची मागणी आहे. यंदाच्या पावसाळ्यात ठिकठिकाणी अतिवृष्टी व ढगफुटीसारखी परिस्थिती निर्माण झाली. सप्टेंबर महिन्यात या आपत्तीचा अतिरेक झाला. नेवासे तालुक्यातील ५० टक्क्यांहून अधिक शेती पाऊस व पुराच्या पाण्याने उद्ध्वस्त झाली आहे. काढणी हंगामातील उभ्या पिकावर शेतकऱ्यांनी पाहिलेली सर्व स्वप्ने अक्षरशः वाहून गेली. अनेक नागरिकांच्या घराची पावसाने पडझड होऊन त्यांचे कौटुंबिक व व्यावसायिक साहित्य वाहून गेले आहे. यामुळे ग्रामीण व शहरी भागातील नागरिकांवर आर्थिक संकट कोसळले आहे.

केवळ शेतकरीच नव्हे तर छोट्या व्यापाऱ्यांचे दैनंदिन उपजीविकेची साधनसामग्रीही वाहून गेली. त्यांच्या जगण्याचा प्रश्नच उभा राहिला आहे. ही परिस्थिती तातडीची असून, लोकांना उभारी देण्यासाठी शासनाने तत्काळ ओला दुष्काळ जाहीर करून सरसकट मदतीची घोषणा करावी, अशी मागणी आमदार लंघे यांनी केली.

नेवासा तालुक्याचे सांस्कृतिक, अध्यात्मिक आणि भौगोलिक महत्त्व लक्षात घेता, नुकसानग्रस्त शेतकरी व नागरिकांना शासनाकडून शक्य तितकी जास्तीत जास्त मदत मिळायला पाहिजे, अशी भूमिका आमदार लंघे यांनी मांडली.

# कर्जतमधील रस्ते खड्डेमय; वृक्षारोपण करून आंदोलन

लोकसत्ता वार्ताहर

**कर्जत :** शहरात दीडशे कोटी रुपये खर्चून तयार केलेल्या रस्त्यावरही मोठे खड्डे पडल्याने राष्ट्रवादी काँग्रेसने (शरद पवार गट) याकडे लक्ष वेधण्यासाठी खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करून गांधीगिरी आंदोलन केले. छत्रपती शिवाजी महाराज चौकात यावेळी जोरदार घोषणाबाजीही करण्यात आली.

माजी नगराध्यक्ष नामदेव राऊत यांच्या नेतृत्वाखालील आंदोलनात अजय बोरा, अजय भैलुमे, भूषण ढेरे, रजाक झारेकरी, नामदेव थोरात, अल्ताफ सय्यद, रघुनाथ काळदाते, ऋषिकेश धांडे, राजेंद्र पवार, महेंद्र थोरात, सागर सुर्वे, रमेश कचरे आदी सहभागी झाले होते.

कर्जत शहरासह परिसरातील रस्त्यांवर मोठे खड्डे पडले आहेत. वारंवार अपघात होऊन नागरिक जखमी झाले आहेत. कर्जत-राशीन, कुळधरण रस्ता खड्डेमय झाला आहे. वाहनांचेही नुकसान होत आहे. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करत आहे. आज गांधीगिरी करून आंदोलन करण्यात आले. मात्र, पुढील काळात आंदोलन गांधीगिरीचे राहणार नाही, असा इशारा यावेळी नामदेव राऊत त्यांनी दिला. यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

### १५० कोटींच्या रस्त्यावरही खड्डे

कर्जत शहरातील मुख्य रस्ता १५० कोटी रुपये खर्च करून तयार करण्यात आला. मात्र, या रस्त्यावरही खड्डे पडले आहेत. रस्त्याच्या कडेला गटारी बांधण्यात आल्या. मात्र, त्यामधून पाणी वाहत नाही. देखभालीची जबाबदारी ठेकेदाराची असूनही उपाययोजना केल्या जात नाही. याचा त्रास जनतेला सहन करावा लागत आहे, असे नामदेव राऊत म्हणाले.


pnb Housing Finance Limited — Ghar Ki Baat

**परिशिष्ट -IV-A - अचल मालमत्तेची ई-लिलाव-जाहीर विक्री सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) च्या तरतुदींसह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 अंतर्गत अचल मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

नोंदणीकृत कार्यालय :- 9वा मजला, अंतरीक्ष भवन, 22 कस्तुरबा गांधी मार्ग, नवी दिल्ली - 110001, फोन्स :- 011-23357171, 23357172, 23705414, वेब.: www.pnbhousing.com

शाखा अहमदनगर : युनिट क्र - 203, दुसरा मजला, साई मिडास टच, नगर - मनमाड रोड, पंचशील हॉटेल जवळ, सावेडी, अहमदनगर, महाराष्ट्र- 414003.

याद्वारे खाली स्तंभ क्र. - ए मध्ये नमूद कर्जदार व जामीनदारांना आणि सर्व लोकांना सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या खाली स्तंभ - डी मध्ये नमूद अचल मालमत्तेचा **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड** / सुरक्षित धनको च्या प्राधिकृत अधिकारयांनी रचनात्मक / प्रत्यक्ष ताबा घेतलेला असून (स्तंभ - सी मध्ये नमूद केल्यानुसार) त्यांची **''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर खाली नमूद तपशिलानुसार विक्री करण्यात येईल. याद्वारे ही सूचना सद्य दिनांकास सुधारित सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स, 2002 मधील नियम इ 8(6) व 9 अंतर्गत स्तंभ क्र. ए मध्ये नमूद करण्यात आलेल्या कर्जदार / गहाणदार / कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी (ज्ञात किंवा अज्ञात), संबंधित कर्जदार / गहाणदारांच्या (मयत झाले असल्यास) मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक, वारसदार, अभिहस्तांकिती यांना देऊ करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया **मे. पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड / सुरक्षित धनकोच्या वेबसाईटला www.pnbhousing.com** येथे भेट द्यावी.

| कर्ज क्र., कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार / कायदेशीर वारस यांचे नाव (ए) | मागणी केलेली रक्कम व दिनांक (बी) | ताब्याचे स्वरूप (सी) | तारण मालमत्तेचे वर्णन (डी) | आरक्षित किंमत (आ. कि.) (ई) | बयाणा रक्कम (आ. कि. च्या 10%) (एफ) | बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक (जी) | बोली वृद्धी दर (एच) | पाहणीचा दिनांक व वेळ (आय) | लिलावाचा दिनांक व वेळ (जे) | असल्यास, ज्ञात बोजे/न्यायालयीन कज्जे (के) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| NHL/AHMD/0918/582890, नीलेश सरदारमल मेहेर / प्रियांका नीलेश मेहेर, शाखा : अहमदनगर | रु. 10695571.66 आणि 17-02-2020 | प्रत्यक्ष ताबा | शंभूनाथ अपार्टमेंट, हॉल क्र. 1पी पहिला मजला, सीटी स क्र 2225ए, पिंजार लेन, अदाते बाजार जवळ, दालमंडई, अहमदनगर, महाराष्ट्र 414001, भारत. | रु. 3139000 | रु. 313900 | 17-10-2025 | रु. 10000 | 07-10-2025 दु. 12:00 ते दु. 04:00 | 18-10-2025 दु. 2 ते दु. 03:00 दरम्यान | ज्ञात नाही |

***सोबत भरण्याच्या व / वा वसुलीच्या दिनांकापर्यंतचे लागू असेल त्यानुसार वार्षिक 18% दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, शुल्के, अधिभार इ. **पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार वर स्तंभ - के मध्ये जाहीर केलेल्या माहितीशिवाय वर नमूद अचल / अनामत मत्तांच्या संदर्भात इतर कोणतेही बोजे / दावे नाहीत. याशिवाय असे कुठलेही बोजे असल्यास यशस्वी खरेदीदाराने / बोलीदाराने ते स्वतः भरावयाचे आहेत. संभाव्य खरेदीदार / बोलीदारांना विनंती आहे की त्यांनी वर नमूद बोज्यांची स्वतंत्रपणे चौकशी करावी.** (1) आज दिनांकास वर नमूद अचल मालमत्ता / अनामत मत्तांची विक्री करणे, त्यांची विल्हेवाट लावणे इ. पासून पीएनबीएचएफएल / पीएनबीएचएफएल च्या प्राधिकृत अधिकारयांना प्रतिबंध करणारा कोर्टाचा कोणताही हुकुम नाही आणि स्थितीचा उल्लेख स्तंभ क्र. - के मध्ये केला आहे. (2) संभाव्य खरेदीदारांनी / बोलीदारांनी आणि इच्छुकांनी स्तंभ - के मध्ये नमूद केलेल्या प्रक्रिया / आदेश इ. मधील बाजूची स्वतंत्रपणे चौकशी करावी. यात पीएनबीएचएफएल यांचेकडे उपलब्ध असलेल्या दस्तावेजांच्या मालकी हक्काचा समावेश आहे, परंतु ते तेथेपर्यंतचे मर्यादित नसून त्यांनी निविदा / बोली अर्ज सादर करण्याअगोदर किंवा प्रस्ताव देण्याअगोदर सर्व बाबतीत चौकशी करून घ्यावी. बोलीदाराने या लिलावाच्या अटी व शर्तींवर बोली फॉर्मसह स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. (3) कृपया लक्षात घ्यावे की सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(3) च्या अनुषंगाने बोलीदार / खरेदीदार विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम (जमा केलेली बयाणा रक्कम धरून) त्याच दिवशी किंवा फार तर पुढील कामकाजाच्या दिवशी सादर करण्यास बांधील आहे. सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 9(2) नुसार सुरक्षित धनकोस विक्री किमतीच्या 25% एवढी रक्कम प्राप्त झाल्यावरच विक्री बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री रकमेपैकी उर्वरित 75% रक्कम खरेदीदारास विक्रीच्या निश्चितीच्या पावतीच्या दिनांकापासून 15 दिवसांचे आत जमा करावी लागेल अन्यथा अशा ठेवी चुकवल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रीच्या पुष्टीकरण पत्रात नमूद केलेल्या 15 दिवसांच्या अनिवार्य कालावधीच्या समाप्तीच्या तारखेपासून 15 दिवसांच्या आत विक्रीच्या मोबदल्याच्या रकमेचे काही भाग जप्त करेल आणि मालमत्ता / अनामत मत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. **(4) सी1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड हे प्राधिकृत अधिकारयांना ई-लिलावाच्या माध्यमातून विक्रीची प्रक्रिया राबविण्यास मदत करतील. ज्याचे कॉर्पोरेट कार्यालय प्लॉट क्र. 68, तिसरा मजला, सेक्टर 44, गुडगाव, हरियाणा 122003, वेबसाइट - www.bankeauctions.com, मालमत्तेची तपासणी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्याशी संबंधित कोणत्याही सहाय्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नासाठी किंवा नोंदणीसाठी, पीएनबीएचएफएल चे प्राधिकृत व्यक्ती - गणेश अंकुश / निलाक्षी पाटील, टोल फ्री क्र. : 1800 120 8800, ई-मेल : auction@pnbhousing.com, यांचेशी संपर्क साधावा किंवा www.pnbhousing.com येथे भेट द्यावी.**

ठिकाण :- अहमदनगर. दिनांक :- 01.10.2025

स्वा./- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड



IKF Home Finance

**आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड**

प्लॉट # 30/ए । सर्व्हे क्र. : 83/1, 11वा मजला । माय होम ट्विटझा । एपीआयआयसी हैदराबाद नॉलेज सिटी रायदुर्ग । हैदराबाद- 500 081.

**ई-लिलाव विक्री सूचना** (केवळ ई-बोलीच्या माध्यमातून विक्री)

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 च्या नियम 8(6) आणि 9(1) अंतर्गत अचल मालमत्तेची विक्री सूचना.**

याद्वारे **सर्वसामान्य जनतेस** आणि **स्तंभ (ए)** मध्ये नमूद कर्जदार व जामीनदार यांना सूचित करण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे तारण / भारग्रस्त असलेल्या **स्तंभ (सी)** मध्ये वर्णन करण्यात आलेल्या खालील वर्णनाच्या अचल मालमत्तेचा **आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड च्या प्राधिकृत अधिकारयांनी ताबा** घेतलेला असून ज्याचे वर्णन **स्तंभ (डी)** मध्ये दिलेले आहे, तसेच या मालमत्तेची खाली नमूद तपशिलानुसार **''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर विक्री करण्यात येईल.

याद्वारे कर्जदार / गहाणकार आणि संबंधित कर्जदार / गहाणकार (मयत) यांचे **स्तंभ (ए)** मध्ये नमूद कायदेशीर वारस, कायदेशीर प्रतिनिधी **(ज्ञात किंवा अज्ञात)**, निष्पादक, प्रशासक, वारसदार आणि अभिहस्तांकिती यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम **9(1)** अंतर्गत सूचित करण्यात येत आहे. विक्रीच्या अटी व शर्तींच्या तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनको **आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड** यांच्या वेबसाईटवर म्हणजे **https://ikfhomefinance.com आणि https://bankauctions.in** येथे दिलेली लिंक पाहावी.

| | [ए] | [बी] | [सी] | [डी] | [ई व एफ] | [जी] |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | कर्ज खाते क्र., कर्जदार / गहाणकार / जामीनदाराचे नाव | वसूल करावयाची थकबाकी (सुरक्षित कर्जे) | अचल मालमत्ता / अनामत मत्तेचे वर्णन | ताब्याचा प्रकार | आरक्षित किंमत (रु. मध्ये) / बयाणा रक्कम (रु. मध्ये) | लिलाव दिनांक व वेळ |
| 1. | **कर्ज खाते क्र.: LNANG02022-230005162** **1. श्री. गोपाळ बाळू उमाप,** बाळू अर्जुन उमाप यांचा मुलगा **2. सौ. शितल गोपाळ उमाप,** गोपाळ बाळू उमाप यांची पत्नी **3. श्री. अनिल हिरामण धनवटे,** हिरामण धनवटे यांचा मुलगा **अ. क्र. 1 आणि 2 करिता पत्ता :** पोस्टमन कॉलनी, वारुळवाडी रोड, बुरहानगर, अहमदनगर, लँडमार्क वारुळवाडी रोड, महाराष्ट्र - 414002. **अ. क्र. 3 करिता पत्ता :** नवीन सारवाडी, अहमदनगर, जिल्हा प्राथमिक शाळा जवळ, नवीन सावडी, महाराष्ट्र - 414401. | **कर्ज खाते क्र. LNANG02022-230005162 करिता रु. 15,11,728.70 (रुपये पंधरा लाख अकरा हजार सातशे अठ्ठावीस आणि सत्तर पैसे फक्त) दि. 26.09.2025 रोजी नुसार देय.** | प्लॉट मोजमाप क्षेत्रफळ 35.27 चौ. मी. सर्व्हे क्र : 285/2ए पैकी, त्याचे एकूण क्षेत्रफळ 265.44 चौ. मी., वर योग्यरित्या बांधलेले, तळमजला बिल्ट अप क्षेत्रफळ 30.75 चौ. मी. आणि पहिला मजला बिल्ट अप क्षेत्रफळ 20.75 चौ. मी. एकूण बिल्ट अप क्षेत्रफळ 51.50 चौ. मी. सर्व्हे क्र. : 285/2ए पैकी, एकूण जमीन क्षेत्रफळ 0 हे. - 56.50 आर आणि पोटखराबा 0 हे. - 14 आर, भिंगार ता. नगर जिल्हा - अ. नगर येथे स्थित आणि अहमदनगर ग्रामीण च्या स्थानिक हद्दीत. मालमत्तेच्या चतुःसीमा : **पूर्व :** रो बंगलो क्र. 7, **दक्षिण :** रस्ता, **पश्चिम :** रो बंगलो क्र. 5, **उत्तर :** सर्व्हे क्र. 285. | **ताबा** | **रु. 11,11,000/- (रुपये अकरा लाख अकरा हजार फक्त)** / **रु. 1,11,100/- (रुपये एक लाख अकरा हजार शंभर फक्त)** | **17.10.2025** रोजी दु. 02.00 ते दु. 04.00 वाजेपर्यंत (निविदा दस्तावेजामधील अटींनुसार प्रत्येकी 5 मिनिटांच्या स्वयंकालविस्तारांसह) |
| | **पाहणीचा दिनांक व वेळ : 16.10.2025 सकाळी 11.00 ते दु. 04.00 वा.** | | | | **किमान बोली वृद्धी रक्कम : रु. 10,000/-** | |
| | **सहभागासाठी बिड / ईएमडी / विनंती पत्र सादर करण्याची शेवटची दिनांक : 17.10.2025 सायं. 05.00 वा. पूर्वी** | | | | | |

*** सोबत भरणा / वसुलीच्या दिनांकापर्यंतचे कर्ज करारातील अटींनुसार लागू असलेले पुढील व्याज आणि आनुषंगिक खर्च, शुल्के व अधिभार इ.**

मालमत्तेच्या तपासणीशी संबंधित कोणत्याही मदतीसाठी किंवा बोली दस्तऐवज मिळविण्यासाठी आणि इतर कोणत्याही प्रश्नांसाठी, कृपया **आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड** चे अधिकारी **अयाज इफ्तेखार सय्यद शाह, ईमेल आयडी : ayaz@ikfhomefinance.com, यांचा मोबाईल क्र. 9975553222 / श्री. मोहम्मद अब्दुल, मुख्य कार्यालय, मोबाईल क्र. 77948 65511 वर संपर्क साधा. आयकेएफ होम फायनान्स लिमिटेड** च्या प्राधिकृत अधिकारयाच्या उत्तम ज्ञानानुसार आणि माहितीनुसार, वरील स्थावर मालमत्ता / सुरक्षित मालमत्तेच्या बाबतीत कोणतेही भार नाहीत.

**दिनांक : 29.09.2025**
**ठिकाण : अहमदनगर, महाराष्ट्र**

**स्वा/- प्राधिकृत अधिकारी, आयकेएफ होम फायनान्स कंपनी लिमिटेड करिता**



**सार्वजनिक सूचना**

सूचना देण्यात येत आहे की, केएसएच इंटरनॅशनल लिमिटेड (आधीचे नाव केएसएच इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड) यांना प्रस्तावित 'इंडस्ट्रियल शेड डेव्हलपमेंट' प्रकल्पासाठी जो प्लॉट क्रमांक - एफ २२३ सुपा-पारनेर इंडस्ट्रियल पार्क, गाव-पळवे खुर्द, तालुका-पारनेर, जिल्हा-अहिल्यानगर, महाराष्ट्र येथे स्थित असून त्यास २४/०९/२०२५ रोजी स्टेट एन्व्हायरॉनमेंट इम्पॅक्ट असेसमेंट अथॉरिटी, महाराष्ट्र यांनी एन्व्हायरॉनमेंटल इम्पॅक्ट असेसमेंट नोटिफिकेशन २००६ अंतर्गत पर्यावरणीय मंजुरी दिली आहे. सदर मंजुरी भारत सरकारच्या पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाला सादर केलेल्या इ सी अर्ज क्रमांक SIA/MH/INFRA2/528727/2025 च्या अनुषंगाने देण्यात आली आहे, ज्याचा ओळख क्रमांक: EC25C3806MH5854903N आहे आणि ती मंजुरी https://parivesh.nic.in/ या वेबसाईटवरील PARIVESH पोर्टलवर प्रकाशित करण्यात आली आहे. २४/०९/२०२५ च्या पर्यावरणीय मंजुरीची प्रत महाराष्ट्र सरकारच्या पर्यावरण आणि हवामान बदल विभाग आणि स्टेट एन्व्हायरॉनमेंट इम्पॅक्ट असेसमेंट अथॉरिटी, महाराष्ट्र यांच्याकडे उपलब्ध आहे.

सही/-
**मेसर्स केएसएच इंटरनॅशनल लिमिटेड**
(आधीचे नाव केएसएच इंटरनॅशनल प्रायव्हेट लिमिटेड)



